# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 July 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १३ जूलै २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून उज्वल निकम यांच्यासह चार मान्यवरांची राज्यसभेवर नियुक्ती
- शुभांशू शुक्ला यांच्यासह अन्य तीन अंतराळविरांचा पृथ्वीवर परतीचा प्रवास उद्यापासून सुरू
- भारत–इंग्लंड तिसऱ्या कसोटीत चौथ्या दिवशी इंग्लंडच्या चार बाद ९८ धावा

आणि

- विम्बल्डन पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात आज इटलीच्या यानिक सिनर आणि स्पेनच्या कार्लोस अल्काराझ यांच्यात लढत

****

ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची राज्यसभेवर राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून निवड करण्यात आली आहे. या सोबतच माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन शृंगला, प्रसिद्ध इतिहास तज्ज्ञ डॉ. मीनाक्षी जैन आणि केरळमधील प्रसिद्ध समाजसेवक आणि शिक्षणतज्ज्ञ सी सदानंदन मास्टर यांनाही राज्यसभेसाठी नामांकित करण्यात आले आहे. संविधानाच्या अनुच्छेद ८० अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करत राष्ट्रपतींनी ही नियुक्ती केली आहे.

उज्वल निकम यांनी आपल्या आजवरच्या कारकीर्दीमध्ये १९९३ चे मुंबई बॉम्बस्फोट खटले, गुलशन कुमार हत्या प्रकरण, प्रमोद महाजन हत्या प्रकरण, २६/११ मुंबई हल्ला, कोपर्डी बलात्कार प्रकरण आदी हाय–प्रोफाईल गुन्ह्यांमध्ये सरकारी वकील म्हणून प्रभावी युक्तिवाद करून गुन्हेगारांना शिक्षा मिळवून

देण्यासाठी मोलाची भूमिका बजावली आहे. सध्या निकम हे बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात विशेष सरकारी वकील आहेत.
आपली राज्यसभेवर निवड झाल्यावर प्रतिक्रिया देताना उज्वल निकम म्हणाले –

**बाईट – ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वकील उज्ज्वल निकम, सी सदानंदन मास्टर, हर्षवर्धन शृंगला आणि मीनाक्षी जैन यांचे राज्यसभेवर नामांकन झाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. उज्ज्वल निकम यांनी संविधान आणि कायद्याच्या क्षेत्रात अनुकरणीय योगदान दिलं आहे, असं समाज माध्यमांवरील संदेशाद्वारे मोदी यांनी म्हटले आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी जुलै महिन्याच्या शेवटच्या रविवारी अर्थात २७ तारखेला सकाळी अकरा वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रम मालिकेतून जनतेसमोर आपले विचार मांडणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२४ वा भाग असणार आहे. हा कार्यक्रम आकाशवाणीसह दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून प्रसारीत होईल. या कार्यक्रमात प्रस्तुत करण्यासाठी महत्वाच्या मुद्यांबाबत जनतेच्या सूचना मागवण्यात येत असून येत्या २५ जुलैपर्यंत नागरिकांना आपलं मनोगत माय जी ओ व्ही डॉट इन संकेतस्थळ तसंच नि:शुल्क दूरध्वनी क्रमांक एक आठ शून्य शून्य - अकरा - सात आठ शून्य शून्य याद्वारे व्यक्त करता येईल.

****

एक्सिओम–चार अभियानांतर्गत चौदा दिवसीय अंतराळ प्रवासासाठी गेलेले ग्रुप कैप्टन शुभांशू शुक्ला आणि त्यांचे अन्य तीन सहप्रवासी उद्या आपला परतीचा प्रवास सुरू करणार आहेत. परवा, मंगळवारी भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी तीन वाजता हे चौघे पृथ्वीवर पोहोचतील. शुभांशु शुक्ला यांनी भारतासाठी अंतराळात एकूण सात प्रयोग केले आहेत.

****

भारतीय आयुर्वेद वैद्यकीय पद्धतीतील शल्यक्रियेचे जनक आचार्य सुश्रुत यांच्या जयंतीच्या निमित्तानं नवी दिल्ली इथं अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेतर्फे तीन दिवसीय 'शल्यकॉन २०२५' या राष्ट्रीय परिसंवादाला आज प्रारंभ झाला. परिसंवादात उद्या होणाऱ्या मुख्य सोहळ्याला केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अखिल भारतीय आयुर्वेद

संस्था तिच्या स्थापनेपासून जगभरात आयुर्वेदाचा प्रचार करण्यासाठी समर्पित असून, यंदाच्या शल्यकॉन परिसंवादात आयुर्वेदाची मूलतत्त्वे आणि आधुनिक शस्त्रक्रिया यांचे एकत्रीकरण करण्यावर भर देण्यात येत आहे.

****

खलिस्तानवादी आठ अतिरेक्यांना अमेरीकी एजन्सी एफ.बी.आय.नं ताब्यात घेतलं आहे. त्यांच्याकडून मोठ्याप्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरू आहे. एनआयएच्या मोस्ट वॉन्टेड यादीत असलेल्या एका अतिरेक्याचाही यात समावेश आहे.

****

छत्रपती संभाजीनगरमधील शाळांमध्ये दर्जात्मक सुधारणा व्हावी आणि गुणवत्तेचा आढावा घेण्यासाठी १५ जुलै ते ३१ जुलै दरम्यान शाळांची तपासणी केली जाणार आहे. जिल्ह्यातील २२४ शाळांच्या तपासणीसाठी ६५ पथके तयार केली आहेत. प्रत्येक पथकात चार सदस्य असतील. ते प्रत्येकी सहा शाळांची तपासणी करतील. राज्य शाळा मानक प्राधिकरण, शाळा गुणवत्ता आणि आश्वासन आराखडा (स्कॉफ) याअंतर्गत राज्यातील सर्व शाळांना स्वमूल्यांकन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार प्रत्येक तपासणी पथकात गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, जिल्हा शिक्षण, प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता आणि केंद्रप्रमुख यांचा समावेश आहे. या चार सदस्यीय पथकांनी १५ दिवसांत सहा शाळांची तपासणी करून आवश्यक अहवाल तयार करून वरिष्ठांना सादर करणे बंधनकारक आहे.

****

नागपूरमधे धंतोली इथं प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या, नवीन असलेल्या सात मजली इमारतीचं भूमीपूजन आज मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. नव्यानं सुरु झालेल्या ३ राज्यस्तरीय प्रकल्पांचं लोकार्पणही ऑनलाईन पद्धतीनं मुख्यमंत्र्यांनी केलं.

****

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहाय्यक संघटनेतर्फे विविध मागण्यांसाठी उद्या मुंबईत विधान भवनावर मोर्चा काढण्यात येणार आहे. राज्यातील एक लाख, ३४ हजार युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरूपी रोजगार, मानधनात वाढ यासह अन्य मागण्यांसाठी हा मोर्चा असणार आहे. संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर यांनी काल लातूरमध्ये पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. राज्यातील

बेरोजगारी संपुष्टात आणण्याच्या दृष्टीनं दहा लाख युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देण्याचा संघटनेचं उद्दीष्ट आहे. विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात ही योजना सुरु केली होती.

****

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या आदेशानुसार लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ५९ जागा आणि त्याअंतर्गत सर्व पंचायत समित्यांच्या ११८ जागांसाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार उद्या १४ जुलै रोजी प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानुसार लातूरच्या सर्व शासकीय कार्यालयांतील फलकांवर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाणार आहे. याविषयी हरकती आणि सूचना असल्यास, त्या १४ जुलै ते २१जुलै या कालावधीत लातूर जिल्हाधिकारी कार्यालय इथल्या ग्रामपंचायत निवडणूक शाखेत सादर करता येतील. सर्व संबंधितांनी या रचनेचं अवलोकन करून हरकती आणि सूचना सादर करण्याचं आवाहन लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीच्या औचित्यानं आणि एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी या प्रेरणादायी उपक्रमांतर्गत हिवरे बाजार इथं मातृस्मृती वनमंदिरात आज वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांच्या हस्ते फणस आणि आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते बेहडा वृक्षाची रोपटी लावण्यात आली. हिवरे बाजार आणि राळेगणसिद्धी या गावांचा उल्लेख भारतातील ग्रामविकासाचे मॉडेल म्हणून करत देशाचा विकास ग्रामीण भागातूनच शक्य असल्याचं प्राध्यापक राम शिंदे यांनी यावेळी सांगितलं. पद्मश्री पोपटराव पवार यांनी आपल्या कार्यातून हे सिद्ध केलं असल्याचंही ते याप्रसंगी म्हणाले. या कार्यक्रमाला आमदार काशिनाथ दाते, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे यांच्यासह गावातील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

****

बीड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना उद्या १४ जुलै रोजी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर आणि बीड जिल्हा सूचना विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ही माहिती उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी दिली आहे.

****

चेन्नई विभागात रेल्वे गाडी रुळावरुन घसरल्यानं काही रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहे. त्यापैकी नांदेड विभागातून धावणारी चेन्नई-नागरसोल-चेन्नई एक्सप्रेसची एक फेरी रद्द करण्यात आली आहे. आज चेन्नई येथून सुटणारी चेन्नई ते नागरसोल एक्सप्रेस तर उद्या नगरसोल इथून निघणारी नागरसोल ते चेन्नई एक्सप्रेस रद्द करण्यात आल्याची माहिती दक्षिण मध्य रेल्वे नांदेडच्या जनसंपर्क विभागानं दिली आहे.

****

भारत आणि इंग्लड यांच्यात होत असलेल्या अँडरसन-तेंडूलकर क्रिकेट मालिकेतील तिसरा सामना लॉर्डसच्या मैदानावर सुरू आहे. आज सामन्याच्या चौथ्या दिवशी शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंड संघाने दुसऱ्या डावात ४ गडी बाद ९८ धावा केल्या होत्या. पहिल्या डावात दोन्ही संघांनी सर्वबाद ३८७ धावा काढल्या होत्या.

****

विम्बलडन टेनिस स्पर्धेत आज पुरुष एकेरीच्या अंतिम लढतीत इटलीच्या यानिक सिनर आणि स्पेनच्या कार्लोस अल्काराझ यांच्यात सामना रंगणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री साडेआठ वाजता हा सामना सुरू होईल. फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतही अजिंक्यपदासाठीची लढत या दोघात झाली होती. आता अल्काराझ हिरवळीवरच्या खेळातही वर्चस्व सिद्ध करणार? की सिनर फ्रेंच स्पर्धेतल्या पराभवाचा वचपा काढणार? याबद्दल टेनिसप्रेमींमधे उत्सुकता आहे.

****